परिचय प्रकाशन, मिरज

१९५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २०७१

# मन्थन

REFBK-0010570
REFBK-0010570

किंमत १ रुपया

परिचय प्रकाशन, मिरज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

# ★ मन्थन ★

(नवोदित कवींचा काव्य--संग्रह)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ७६९९२ वि: काव्य
क्रमांक २०७१ नों. दि. ३०।३।७९

: संपादक :

जि. स. बागलकोटे, मिरज.

REFBK-0010570
REFBK-0010570

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०४५०७

किंमत १ रुपया

: मुद्रक :
जि. स. बागलकोटे,
दि डेक्कन प्रिंटिंग प्रेस,
मिरज.

★

मे, १९५९

★

: प्रकाशक :
जि. स. बागलकोटे,
प्रकाशन-प्रमुख,
परिचय प्रकाशन, मिरज.

विद्या व उद्योग यांच्या वाढीसाठीं झटणारे
सर्वच सत्कार्याला नेहमीं आधार देणारे

## हिज हायनेस



## श्रीमंत राजेसाहेब, सांगली

यांना

त्यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त
सादर समर्पण.

--जि. स. बागलकोटे

# -- प्रास्ताविक --

नवोदित कवींचा हा काव्यसंग्रह तयार करण्याला ज्यांनीं सहकार्य दिलें त्या सर्व मित्रांचा मी आभारी आहे. राजकवि यशवंतांनीं प्रोत्साहन दिलें त्यामुळे केलेल्या या कार्याबद्दल समाधान वाटलें सांगलीचे हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांनीं 'मन्थन' अर्पण करण्याला आपुलकीनें मान्यता दिली त्याबद्दल कृतज्ञता वाटते. साहित्य संमेलनाच्यावेळीं केलेली सरस्वतीची ही सेवा गोड करून घ्यावी. कविता नवोदित कवींच्या आहेत. या उपक्रमाला प्रोत्साहन द्यावयाचें यादृष्टीनें या काव्यसंग्रहाकडे पहावें येवढीच विनंती.

१४-५-५९ — संपादक

## राजकवि 'यशवन्त' यांचा

# : : आशीर्वाद : :

नवोदितांचा हा कवितासंग्रह प्रकाशित करण्याला मराठी साहित्य संमेलनाच्या मिरज अधिवेशनाचा मुहूर्त संपादक श्री. जि. स. बागलकोटे ह्यांनीं साधला आहे. संमेलनांत असें कांहीं वाङ्मयीन कार्य व्हावें हें समुचित होय. अर्थात् ह्या 'मंथनां'तून प्रगट होत असलेले कवि तसे प्रथितयश नसल्यामुळें श्री. बागलकोटे यांचा हा उद्योग हिशेबाच्या दृष्टीनें कसा काय किफायतशीर होणार, हा प्रश्न आहे. तरी पण त्यांनीं केलेला हा उद्योग सद्हेतुमुलक आहे--खुद्द कवि--कवियित्रींना प्रोत्साहक ठरणार आहे.

'अजुनि मनाचा घाटा पोंचट' ही अभिव्यक्तीची तऱ्हा कौतुकास्पद आहे. निशा हिर्डे यांची 'कुतुबमीनार' ही कविता वाचनीय वाटते. अनुभूतीचा स्वर ज्या शब्दांतून निघतो ते शब्द (केवळ अनुकरण स्वरूपीं शब्दरचनेपेक्षां अधिक) वेधक

वाटावेंत, हें रास्तच नव्हें कां ? जें जाणवलें, जें अनुभवलें त्याची 'मम शांतिसुखाचा तूंच धनी' ह्या कवितेंत छटा आहे. चौधरी यांची 'रहस्य' कविता आणि सदानंद कुलकर्णी यांची 'तळमळ' ह्यांनून मुकी संवेदना बोलकी होत असल्याची जाणीव येते. सुलभा तोफखाने यांनीं 'तुज पोंचायाचें पैलतिराला' हा जो मनाला इषारा देऊन एकप्रकारें धीरहि दिला आहे तो आवश्यकच आहे. जीवितयात्रेकरूच्या मनीं निर्धार उत्पन्न व्हायला अशीच अनुभवाच्या आर्ततेची बोली हवी.

प्रस्तुत कवि-कवियित्रींनीं आपल्या जीवितांतलें कांहीं क्षण अशा निर्मितीच्या आनंदाच्या कारणीं लावावेंत ह्याचें कौतुक वाटतें. हाच आनंददायी छंद, हेंच एक व्यक्तिपुरतें तरी, खास श्रेय होय; मग ह्या छंदाला जनमन विनोदनाचें व्यापक रूप आलें तर तें स्वागतार्हच होईल, हें काय सांगायला पाहिजे ?

: मिरज :
१३-५-५९

"यशवन्त" दि. पेण्ढरकर

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥



## : पूजा :

असे बलविहीन मी मग कुठोनि आणूं तरी ।
पुरंदर-वनांतलें सुमन दिव्य ज्यां माधुरी ॥

घरींच परड्यांत जीं उमलतात पानें फुलें ।
त्वदीय चरणावरी प्रभुवरा तयां अर्पिलें ॥

सुगंधित विगंधि वा मज न ठावुकें हीं कशी ।
त्वदर्चन करावया असति कीं अनाघ्रातशी ॥

सुगंध असला तरी उचलुनि हृदाशी धरी ।
न वास रुचला सुखें तरी तुडीव पायातळीं ॥

श्रीहरी मजसी त्याचा विषाद लवही नसे
घडली तव पूजा हें काय सौभाग्य अल्पसे

--श्रीगणुदासदास

## : भक्तीपर अभंग :

राम माझें धन राम माझा प्राण ।
करोनी अर्चन तोषवीते ।।१।।

राम माझा धनी राम माझा गुणी ।
अर्पिते चरणीं देह माझा ।।२।।

रामनाम महिमा रामपाद महिमा ।
रामप्रेम महिमा वर्णू किती ।।३।।

धन्य वाल्या कोळी रामनामें झाला ।
वाल्मिकी शोभला रामायणीं ।।४।।

धन्य ती शबरी चाखुनिया बोरे ।
देई प्रेमादरें रामचंद्रा ।।५।।

रामपदस्पर्शें अहल्या पुनीत ।
वंद्य जगतांत झाली असे ।।५।।

सुबुद्धि देऊनी ठेवी शुद्ध ।
भक्तांचें कल्याण राम करी ।।७।।

--श्रीमंत सौ. राणीसाहेब, मिरज.

सौ. कमलाबाई सोहनी, मुंबईः- या गेलीं पंधरा-सोळा वर्षे यथानुशक्ती सामाजिक कार्य व बारा-तेरा वर्षे हिंदीचे वर्ग चालवित आहेत. त्यांना काव्य करण्याचा छंद असून सर्व विषय स्पर्शित काव्यें बरीच केलेलीं आहेत. नवरात्र, गणेशोत्सव, स्त्रीसमाजांतून काव्य-वाचनाचें प्रभावी कार्यक्रम होत असतात. कवि-संमेलनांतूनहि भाग असतो.

## : 'देव आहे तुझ्यापाशीं' :

देव हवा होता मला, मन शोध करी नित्य ।
शोधूं कुठें भगवंता, स्थान तुझें कोठें सत्य ? ।।१।।

प्रातःकाली उठोनीया केल्या काकड-आरत्या ।
आवळ्याचे दीप लावी, निरांजनें, उदबत्त्या ।।२।।

एकादशीच्या भजनीं भक्तिभावें आळवीलें ।
पोथ्या-पुराणें समग्र, नाना ग्रंथ चाळियेले ।।३।।

स्तोत्रें महात्म्यें वाचीली, तेथें शब्दांत सापडे ।
तप-धारणा, समाधी लावियली, तो नातुडे ।।४।।

मन वारंवार सांगे, "देव आहे तुझ्यापाशीं ।
त्यास सोडून विविध ठिकाणीं कां शोधितेसी?" ॥५॥

नको प्रतीक्षा, साहित्य, नको मूर्ति देवालय ।
सृष्टीकर्त्याच्या शक्तीचे तुझ्या भोवती वलय ॥६॥

तुज दिसेल ईश्वर, जरी धरीसील भाव ।
'तुझ्यापुढें उभा आहे, साऱ्या विश्वाचा मानव' ॥७॥

तुज दिसलाही नाहीं ? गेली होऊन चाळीशीं ।
अंतःचक्षु वरी लाव, पूर्ण विचार 'चाळीशी' ॥८॥

पौर्णिमेच्या इंदु सम करोनियां शुद्ध मन ।
मानवतें पहा सर्वां, दिसेल तो दया-घन ॥९॥

त्याच्यावरी ठेव भक्ति, कृति करी भूतदये ।
जगताचा विश्वंभर तुला पाहील सदयें ॥१०॥

--सौ. कमलाबाई सोहनी, दादर

सुलभा वासुदेव तोफखानेः— जन्म २५ ऑक्टोबर, १९३८. जन्म बेळगांवचा असला तरी आजपर्यंतचें वीस वर्षांचें सर्व आयुष्य कोल्हापुरांतच गेलेलें आहे. सध्यां कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्यें बी. ए. चा अभ्यास करीत आहेत.

## तुज पोहोंचायाचें आहे पैलतिराला---

हा भयाण दिधला रस्ता चालायाला
पसरुनिया वरती कांटे, दगड, धुराळा
बोंचुनिया चाळण जरी होत पायांची
तरि पोहोंचायाचें आहे पैलतिराला

गुणगुणतीं येथें चिलटें, डांस सभोंती
मार्गांत मणेरी, फुरशी आडवि पडतीं
या इथें नसे ना व्याघ्र दडुनि बसलेला?
जरि असला, तरि गेलेच पाहिजे पुढती

या इथें टांगली डोईवर तलवार
चहुंकडे पसरला जाळत जहरि विखार
झरि टवके उडुनि आग होत अंगाची
केलाच पाहिजे पार हाय अंगार

जरि चालायाचें सोडून मी थांबेन
भिऊनिया सर्प-व्याघ्रास परत येईन
तरि मार्ग न उरला पुन्हां परत येण्याला
येथेंच थांबणें त्याहुनि महा-कठीण

जरि वांचवीन शिर शकलें होऊं न देतां
पाहीन टाळण्या विखार किंवा जळता
तर नेत्रांपुढला मार्ग बंद होईल
ही नव्हेच जागा योग्य टेकण्या माथा

चल आक्रमि जीवा, भयाण जरि हा असला
पथ लिहिला आहे दैवें तव भाळाला
मन पिचुं दे किंवा शरिर थकूं दे कितिही
तुज पोहोंचायाचें आहे पैलतीराला . . . .

--सुलभा तोफखाने

डॉ. कृष्णानंद शंकर गोगटे, आय्. ए., डी. ए. एस्. एफ्. (मुंबई) वैद्यभूषण (श्री अयोध्या). संख ता. जत, जि. दक्षिण सातारा येथील सरकारी दवाखान्यावर प्रमुख म्हणून आहेत. दैनिक प्रकाश मध्यें सहसंपादक होते. डॉ. पाठक यांच्या ‘ चिरायु ’ मासिकाचे संपादक म्हणून काम करतात.

## : मम शांतिसुखाचा तूंच धनी :

मम शांतिसुखाचा तूंच धनी
घे मानुनि वा अवमान मनीं

तरंग हृदयीं अनंत उठती
हृदयीं तुझ्या जाउनि बिलगती
प्रतिध्वनीसम फिरून उमटती
घडें काय तें मज न कळे

जीवनपथि सहज भेटलो
हंसलो आणि खूप भटकलो
भांडुन रुसलो पुन्हां हासलो
कसे घडें तें मज न कळे

प्रेमतंतूचें सुवस्त्र विणलें
त्यागरूप ते रंगें खुलले
परस्परावर जीव वाहिले
कोण घडवि हें मज न कळे

पुढें जायचे असेच कुठवर
ध्येय असें तें अजुनि दूरवर
मनास लागे एकच हुरहुर
--असे तुझ्यावर विश्वसुनि

--कृष्णानंद गोगटे

लक्ष्मण नारायण गोखले :- हे मुळचे जमखंडीचे. नोकरी-निमित्त १९२६ सालीं वऱ्हाडांत आले. हल्लीं ते अकोटला पोस्टमास्तर आहेत. मॅट्रिकमध्यें शिकत असतानाच काव्य करूं लागले. आतांपर्यंत शंभरचेवर कविता निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांची कविता खडीसाखरेसारखी आहे असा शेराहि त्यांनीं मिळविलेला आहे.

## : मासिकांतील कविता :

मासिकांतल्या कविता कोणी नाहीही पाहत
कशाला त्या हो तरि छापित ?
मीठ तिखट लोणचे भरितही भाजी पंचामृत
विना त्या, पानहि कां शोभत ?
ताट-पाट रांगोळि देखता, प्रसन्न मन वाटत
जिभेच्या जिभल्या लाडावत !
सौंदर्याच्या भालप्रदेशीं कुंकू कां लावित ?
ना तरी, हृदयीं कालावत . . .
उत्तर सोपें, प्रश्न कठिण हा ऐसे मज वाटत
गोप्य तें नाहीं मी सांगत !

--लक्ष्मण नारायण गोखले.

तु. वि. सूर्यवंशी, रा. बांबवडे, जि. द. सातारा. शिक्षण मॅट्रिकपर्यंत, साहित्यप्राज्ञ. सध्यां मुंबई येथें रेल्वेखात्यांत नोकरी. लिखाण:- 'दसरा', 'घरांत-पाऊल', 'जीवांशु', 'उजाड माळ'; कादंबऱ्या. 'ही माणसाची अवलाद', 'संसारांत राम' नाटके. 'नवा ताजमहाल', 'मानाची पुतळी'; कथासंग्रह. 'काव्य-कलश' काव्यसंग्रह. हे सर्व अप्रकाशित. नुकतीच 'धनुर्धारी' तून 'जिव्हाळा' कथा प्रसिद्ध.

## : तूंच सखये ! :

(पादाकुलक)

तुलाच सखये धरितो हृदयीं
तुलाच एकटचा स्थान मंदिरीं
टाकीला तूंच ग संजीवक
बाहुपाशांत तूं मनीं घरीं ॥१॥

तूंच भोंवतींचे सुगंधी वारे
तूंच माझें ग रूप गोजीरें
तुला वाहिलें जीवन सारें
तुजभोंवतीं मी भृंग फिरे ॥२॥

तूं प्रेमाची अन् शांतीची
तुजमुळें होई सव्यासाची
तूं मोहरिलें किति उषःकाल
दिलास जवळीं गोबरा गाल ।।३।।

तूंच शिकविलें प्रेम हितगुज
तूंच केलें मम सफल जीवन
तूंच घालिशी कुंपण सहज
तूंच शिकवतेस नि मज संयम ।।४।।

--सूर्यवंशी

## : "तितिक्षा" : (जातिः- चकित हरणी)

जावें वाटें येथून अनंताकडे
तितिक्षा मनीं क्षितीजाकडे ।।धृ।।

गानसुस्वर रम्य करी, शारदा जिथें
माथीं भिडलीं गगनीं पर्वतांची तिथें
जेथूनि सुटतीं बलाक सांजी जथें
दूर शुन्यांतून, विशाल वितानांकडे
तितिक्षा मनीं क्षितीजाकडे ।।१।।

सामावलें जीवन ज्या मरणीं जगणें
या खद्योतासम घनतमीं रमणें
साहे न मला, फाल्गुन ऊन रणरणें
घाटे मनीं, सुधांशु बरसे अमृतघडें
शीत त्या शांत चांदण्यांकडे ।।२।।

तें किन्नर सुंदर, वसतीं सदरेवरीं
दंग अप्सरा नित विलास, मंद मंजरीं
मी तृषाक्रांत द्रुतपळें, हरणा परीं
ही जीवकालिका पहात टेकडींकडें
तितिक्षा मम क्षितीजाकडे ।।३।।

---सूर्यवंशी

हसनसाहेब फत्तूसाहेब शेख, रा. संख, ता. जत, जिल्हा दक्षिण सातारा. शिक्षण मराठी सातवी व इंग्रजी. पायानें अधू असून देखील दिल्लीपर्यंतचा प्रवास केला आहे. वाचनाची व कविता करण्याची हौस आहे.

## : फुलांचा सडा :

कितो मौज दिसे, हें पहा तरी हीं फुलें उधळलीं चौफेरी ।।धृ।।
रवि जाई शयन मंदिरीं
मेघ तांबडे रंगीत वरी
आकाश दिसे गुलाल परी
गुलाल उधळें जगुं वरी, हीं फुलें उधळलीं चौफेरीं

खोडकर वारा येऊन गेला
वृक्ष वेली फुलें हसविला
खोड्या करूनि तो बघ गेला
गळून पडे फुलें भूवरी हीं फुलें उधळलीं चौफेरी

भूवर होती तांबडी माती
वरूनि गळे हि श्वेतफुलें तीं
रांगोळी काढी जणुं वाटती
दृष्य मनोहर खरोखरी हि फुलें उधळलीं चौफेरी

राजा आमचा येतो म्हणती
सज्ज साजनें स्वागत करीती
आतुर पहा कितीहि पहा धरित्री
धन्य मेघराजा खरोखरी, हि फुलें उधळलीं चौफेरीं

— ह. फ. शेख

श्री. गोविंद पर्वतराव नन्नोरे:- जन्म १९१९, अमरावती जिल्ह्यांतील घानोरा गांवीं. बालपणापासून कविता करण्याचा नाद. पुरोगामी विचार, लढाऊवृत्ति व विनोदी स्वभाव हें यांचें वैशिष्ठय आहे. सध्यां धामणगांव येथील श्रीशिवछत्रपति हाय-स्कूलमध्यें अध्यापक आहेत. यांचा 'तळतळ' काव्यसंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०४५०

## : मार्गप्रतीक्षा :

चारांत चारोळी । डोळयांत बाहुली ।
मनांत साबळी । मूर्ति तुझी ! ॥

सुवास सुमनीं । चमक चांदणी ।
मनाच्या कोंदणीं । तूं ग तशी ॥

लाटा त्या सागरीं । तारा त्या अंबरीं ।
विचार अंतरीं । तुझे तसे ! ॥

रवीस किरण । मिनास जीवन ।
माझें हि जीवन । तुझ्या हातीं ! ॥

वसंत येउन । नवीन यौवन ।
सृष्टीस देउन । जसा हांसे ! ॥

तशी तूं साजणी । येऊन धाऊनी ।
टाकी ग वदनी । संजीवनी ! ॥

तुझ्याच करितां । रचली न चीता ।
शरिरांत आतां । नसे त्राण ! ॥

--गोविंद नन्नोरे, साहित्यविशारद

'तळमळ'

या आगामी काव्यसंग्रहांतून

वि. जि. पुजारीः- 'साहित्यशोभा' या वाचनमालेच्या पांचव्या पुस्तकांत या कवीचा 'गजराज' हा धडा आहे. श्री. पुजारी हे 'किर्लोस्कर' मासिकांच्या सम्पादकीय कचेरींत गेलीं पंचवीस वर्षें काम करीत आहेत. त्यांचा 'भेळ' या नांवाचा लेखन-संग्रह लौकरच प्रसिद्ध होणार आहे. शिवाय त्यांनीं किर्लोस्कर, मनोहर, शालापत्रक, मन्वन्तर मासिकांत कविता, गोष्टी, निबंध वगैरे स्फुट लेखन केलें आहे.

## : श्रीकृष्णाच्या जन्मस्थळीं :

(कवि मनाला वाटते कीं, थोरथोर लोकांना तुरुंगांतच स्फूर्ति आली व त्यांनीं आपलें सर्व महत्वाचे लिखाण तेथेंच केलें. तेव्हां आपणहि त्या तुरुंगाचें दर्शन घेऊन तेथें जाऊन यावें.)

ये तुरुंग थोरां स्फूर्ति भलीं
तुज जावें वाटे त्याच स्थळीं ॥धृ॥

मनें, शरीरें कसेंहि जावें
कविस गजांचा प्रतिबंध न ये
मारुन तेथ भराऱ्या घ्यावें
तें दर्शन जागेचेंच मुळीं ॥१॥

कसाहि जाशी तुजशी दिसतिल
कष्ट तयांचे, तुलाहि मिळतील
असह्यतेच्या पलीकडे चल
दिसेल विस्मृति-घनावलि ॥२॥

त्या मेघांच्या पार जाउनी
स्फूर्तिदीप्त आकाश बघूनी
विचार-तारे असंख्य लुटुनी
ती घेइ तयांची बुद्धि बली ॥३॥

टिळक-जवाहर-गांधीजींनीं
वैसे तात्या सावरकरनीं
लिखाण केलें चौबाजूंनीं
श्रीकृष्णाच्या जन्मस्थळीं

--वि. जि. पुजारी

रू. गो. चौधरी, एम्. ए., एम्. एड्. :- नियतकालिकांतून शिक्षणविषयक लेखन- हिंदी भाषा प्रबोध भाग १, २, ३, ४. सदस्य पुणें विद्यापीठ. सध्यां 'विनयन' या पू.खा.मा.शि.संघाच्या नियतकालिकाचे संपादक. शिक्षक, श्री. आ. गं. हायस्कूल, सावदा, पू. खा.

## : रहस्य :

...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
...क्रमांक ७६६९२ दि. ३१०५
... २०४९ नोंद दि. 30131७9

चांदण्यांत चंद्राच्या जेव्हां
रजनीचें रजनीपण विरलें,
तुझ्या हरवल्या तुझेंपणाचें
रहस्य माझेंपणास कळलें

हृदय गंधमय कलिकेचें जंव
पवनाच्या स्पर्शात बहरलें
तुझ्या उराचें स्पंदन कळलें,
उरांत गे माझ्या धडधडलें

निळ्या निळ्या क्षितिजांत जेधवा
सांध्य हास्य सोनेरी दडलें
करपाशीं मम विसांवलेल्या
तुझ्या मुखाचें रहस्य कळलें

काळ्या शेतामध्यें जेव्हां
नवतीचें हिरवेपण नटलें
माझ्या पुरुषामधें, उमगलें
भोळें युवतीपण तव सजलें.

तुझेंपणाचें खुळें पांखरूं
माझ्या माझेंपणांत शिरलें
घरटें माझें आणि चिमुकलें
त्याच्या पंखांमधेंच विरलें

--रू. गो. चौधरी

चिंतामण गोविंद कुलकर्णी, कोंगनोळी, जि. बेळगांव. कागल व कोल्हापूर येथें दुय्यम शिक्षण झाल्यावर कोल्हापूर येथें पोलिस खात्यांत चव्वेचाळीस सालीं नोकरीस सुरुवात. सध्यां मुंबई येथें त्याच खात्यांत नोकरी करीत आहेत.

# : परि मी चिंतीन तुज रमणी :

--गोविंदतनय

प्रिये साजणी. तुझ्या सवे मी चालतसे आज
हांसते दर्याचो ताज ।।धृ।।

पसरली लाडके सफेत वाळू तरी
पसरेल चांदणें सफेत मोत्यापरी
त्या थय थय नाचत लाटा दर्यावरी
सौंदर्य सृष्टिचें तुझ्या सवे हें सेवेला मजपुढें
परीं मी दंग विचारीं कुढें ।।१।।

जरी जुळलें सखये हात तुझें मम करी
जे विचार येतिल निशिदिन तव अंतरीं
परीं विचार मज तव लोटतील ग दुरी
मी नसेन सखये, तव प्रीतीचा हृदयेश्वर ताज
ग्रासती विचार मज आज ॥२॥

जग विशाल आणिक संकुचित साजणी
जरी आपण दोघे आहों या भूवनीं
एकलेपणाचें नवलच वाटे मनीं
ऐक लाडके, नसेल मजला स्थान तुझ्या अंतरीं
परी मी चिंतीन तुज सुंदरी ॥३॥

कल्पना O woman of my love. Arthur Symons वरून

सदानंद श्रीनिवास कुलकर्णी, शंकरशेठ स्कॉलर. राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथें बी. ए. च्या वर्गात शिक्षण. कॉलेजच्या नियतकालिकांत बक्षिसास पात्र ठरलेल्या कविता. शिवाय साधना, स्वराज्य, प्रतिष्ठान, लोकसेवक (कोल्हापूर), इत्यादी नियतकालिकांतून काव्य आणि लघुकथा ह्यांची प्रसिद्धी. गेलीं सात वर्षे कथा व काव्य यांचें नियमित लेखन.

## : तळमळ :

आज मला आहे निश्चिताची हांव
मर्यादेची शीव तरी नको ।

आज जाणायचें अबोधाचें मन
भ्रांतीचें कुंपण ओलांडाया ।

आज हुंगायाचा अमूर्ताचा गंध
स्पर्शिकाचा बंध तोडूनिया ।

तळमळ माझी अव्यथ उरावी
अर्थात भरावी शब्दावीण ।

--सदानंद कुलकर्णी

## : काळास :

निर्दया तुला नच कांहीं अल्पही दया ती जरा
काळ वेळ नच तुज कांहीं निष्ठूर जगीं तूं पुरा

वृद्ध तरुण बाल न कांहीं स्त्री-पुरुष तसे तूं गणिशी
सैतानी लीला तव त्या बघ जगांत कीं माजविशी

आकांक्षा इच्छा पूर्ती जाहली न पूर्ण कुणाची
तृप्ती न कुणाची झाली पर्वा न तुलाही त्याची

थयथयाट-सैतानाचे विक्राळ हास्य तें करुनी
घालिशी जगीं धिंगाणा दुष्टपणा कीं आचरुनी

सन्मार्ग जयें आचरिला कर्तव्याचा ज्यां ध्यास
या नश्वर कुडिचा त्यांना वाटला न कधिं हव्यास

ते वंद्य महात्म्ये जगतीं उन्मत्ता तुज आव्हान
त्यांचेंच सतत तुज आहे तव लवेल तेथें मान

-----वासुदेव बाळाजी भावे,
धरणगांव ( पू. खा. )

## : अडचण :

आपण दोघं
त्यावेळीं
उन्मादक मृद्गंधाचे तृप्त निश्वास टाकणाऱ्या
पायाखालच्या
काळ्या साखरेसारखे भिजलो होतो . . . .

मी म्हटलं---
" ह्या भालकपोलांची
अधरोष्ठांची
एकमेकांत गुंतणाऱ्या . . . घट्ट घट्ट गुंतणाऱ्या
करदलांची
अडचण नाहीं कां रे वाटत ?"
तूं थांबलास.
आपल्या हातांनीं तूं माझं मस्तक धरलंस
अन् माझ्या डोळ्यांत
तुझ्या-माझ्या साऱ्या जीवनकणांना पिळवटून

इतक्या जवळून पाहूचलंस
इतक्या जवळून पाहूचलंस
कीं
तुझ्या अक्षविश्वांतला
मी एक नाममात्र बिंदू झाले ! . . .

० ० ० ० ०

आपण पुन्हां चालूं लागलो
आणि आतां उमटत होत्या
आपल्या मागें
पावलांच्या
दोनच मुद्रा ! !
दोनच !

--अविनाश जोशी

# : अश्रू :

दिव्य प्रीतिचें प्रतिक कृती ही ताजमहाल खरी
शिल्प अलौकिक संगमरवरी यमुनेच्या तीरीं ।।१।।

अमर जयांची प्रीति भूवरी बेगम मुमताज
अन दिल्लीश्वर, भव्य उभविला अतुलनीय ताज ।।२।।

परि कल्पकता शिल्पामधली ज्याची अमर कला
तोच धन्य उस्ताद इसा कीं ताज निर्मियेला ।।३।।

कोण जाणितो परी तयाच्या ज्वलंत इतिहासा
ताजमहाला भवतीं विरल्या त्याच्या निश्वासा ।।४।।

ज्या हृदयींच्या गाभाऱ्यांतरि अतुल शिल्प स्फुरलें
ज्यांच्या प्राणांच्या ज्योतीनें अमरदीप उजळे ।।५।।

सुंदर, कोमल दिव्य कलाकृति ध्येय जीवनाचें
जवान तुर्की स्वप्न रंगवी ताजमहालाचें ।।६।।

मूर्तस्वरूपीं कला उतरली, अमोल मोल परी
त्याग अलौकिक इसा करितसे शर्थ पुरी भारी ॥७॥

बाविस वर्षें अविश्रांत श्रम श्रमले श्रमजीवी
उभा राहिला नितांत सुंदर ताज दीर्घजीवी ॥८॥

ज्या हातांनीं शिल्प घडविलें, ते छाटायाला
बादशहानें आज्ञा केली सेवकांस अपुल्या ॥९॥

भीक, विनवण्या, आर्जव, कामीं ना येई जेव्हां
घुमटामधला चिरा सैलही इसा करी तेव्हां ॥१०॥

हात तोडिले उस्तादाचे घडो न शिल्प दुजे
स्वार्थांधानें काय साधलें यांतुन ना उमजे ॥११॥

वर्षति पर्जन्याच्या धारा, सैल चिऱ्यांतून
अश्रु ठिबकती दीन इसाचे कबरेवरि दोन ॥१२॥

: पनवेल : --सौ. उषा कमलाकर देशमुख, बी.ए.

चं. हा. मगदूम, कोवाड:- काव्य, कथा, लघुनिबंध इत्यादी ललित साहित्याचा अभ्यास पांच सात वर्षे चालू. वाचनाची मोठी हौस. श्री. मगदूम यांची ही पहिलीच प्रकाशित कविता.

## : संध्या :

ही संध्या उधळी किरणें पृथ्वीवरी
वाटलें गोड कसे अंतरीं !

चंचल वायू नदीकांठचा वृक्षांना डोलवी
पर्णांची सळसळ कीं ऐकवी

लाल छटेचें नूपुर बांधुनि जललहरी नाचती
सळसळें हृदयीं कांहीं तरी

सफेत बगळा झुलवित पंखें मार्ग गृहाचा धरी
धावलें मन हें दूर घरीं

वाकून लव्हाळा प्रतिमा अपुली चुंबी जळापरी
आठवें सुखांत कादंबरी

हा मेघ खचविला लाल पांढरा नील नभांगावरी
वाटतें बुडें तेज सागरीं

तांबुस पिवळी किती रंगाचीं फुलें माळलीं गिरीं
सजली दिशा नववधु परी

पण काळ धावला झाली संध्या शीत काजळी परी
शिरली तीव्र खोल कळ उरीं !

--चं. हा. मगदूम
कोवाड, ता. चंदगड

चंद्रकुमार नलगे, भेडसगांव:- हायस्कूलमध्यें असतांनाच साहित्य लिखाणाला आरंभ."भारताची अंध--श्रद्धा" ही नाटिका सन १९५३ मध्यें प्रकाशित झाली. तेव्हांपासून कविता आणि लघुकथा लेखनाला सुरुवात. हल्लीं 'रयत मासिक' (कोल्हापूर) मधून कविता, लघुकथा व विवेचनात्मक लेख यांचें लेखन. साहित्यविशारद असून सध्यां 'आचार्य' चा अभ्यास सुरू.

## : चाहूल :

घरासमोरून जातां
छेडिताहि दिलरूबा
सांवळी मूर्ती मृदुल-
भाव पाहात मी उभा

तारुण्य सुलभा गोड-
लोभसवाणा रुसवा
अंग अंग पुलकीत
बहार यौवनीं नवा

## -: म न्थ न :-

तव डोळ्यांतील खोल-
भावमयीं मुग्ध पाणी
मृदु मंजूळ तरंगी
गात अभिनव गाणी

लज्जेनें डोळे वळती-
चोरून रेखता, खालीं
मम प्रस्फुट भावना
क्षणीं झंकारुन गेली !

तशीं जातां वळणाशीं
दृष्टिक्षेप तो वळून
भिडला गात हृदयीं-
-आर्त निरव ते गान

रोज सकाळीं पहाटें
चाहूल वेधण्या जागे
काल सायंतनी गेली
फिरणार ना मागं ?

--चंद्रकुमार नलगे

## : ओढ :

नव वधू तूं नवी ओढ तुला
अंतरीं तुझ्या लागलेली आस-
सावळ्या कोरींत, टपोऱ्या डोळ्यांत
झुळझुळत्या पदराआडून चोरून पाहतां
कळें मज खास !

निघतां जाया दूर त्या गांवीं
दारा संन्निध स्तब्ध उभी तूं
दारांतून तुज ओलांडून जातां-
अंतरीं तुझ्या वादळ माजे !

अंगणांतील तुळशी वृंदाशीं-
ठाकली, तेव्हां पाहिलें वळून-
व्यथा मनाची असह्य होऊन
ओघळे गोऱ्या गालावरून
अश्रू दोन तीन !
अबोल तुझी दृष्टी बोलकी
भेदून गेली अंतर माझें ! !

--चंद्रकुमार नलगे

अ. गो. पाटील :- प्राथमिक शाळेंत शिक्षक. हल्लीं रुकडी ट्रेनिंग कॉलेजमध्यें सेकंड इअरला आहेत.यांचें मूळ गांव बेळगांव जिल्ह्यांतील सौंदलगा. काव्यसंग्रह काढण्याचा अ. गो. पाटील यांचा विचार आहे.

## : कलिकेला सांभाळ : (रूपक) मुलीला सांभाळ

लतिके कलिकेला सांभाळ
पवन येईल सुगंध नेईल
ग्रीष्म ताप हा असह्य होईल
त्याच्या कडती पाहुनी तूं गे करूं नकोस आबाळ ॥१॥

कलिका होईल सुंदर राणी
गाऊं लागेल सुबास गाणी
गान ऐकुनी होईल बहु गे, भ्रमरांचा सुकाळ ॥२॥

भ्रमर जात ही लबाड मोठी
कलिकेला फूस लावूनी मोठी
सुगंध नेतील टाकुनि तिजला ठरतील ते नाठाळ ॥३॥

--अ. गो. पाटील

जगदीश खेबूडकर :-- लघुकथा, कविता, निबंध, नाटकें, नाटिका, भावगीतें वगैरेंचें गेलीं दहा वर्षें सतत लेखन. नाट्य-गीतांचें बरेच लेखन. काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याचा मानस. एक प्राथमिक शिक्षक.

## : अजुन मनाचा घाटा पोंचट ! :

टंच जाहल्या प्रेमापाठी,
अजुन वासना लपते लोचट,
ताड माड जरि झाड वाढलें,
अजुन मनाचा घाटा पोंचट ! १

तळरस्त्यावर मदन झिंगता,
सज्जामधली लज्जा हंसते,
आणि फुकटचें प्रेम लुबाडित,
अमोरलें घर समोर बघतें ! २

अशा जराशा प्रेमामागुन,
मधुचंद्राची उठते पंगत,
दांभिकतेच्या अंधारीं पण-
बसतीं त्यांचें आत्मे पंगत ! ३

सौंदर्याच्या चाकोरीतुन,
या प्रेमाच्या जाती गाडया,
शरिराच्या पण हमरस्त्यावर
या प्रेमाच्या उठतीं माडया ! ४

युगायुगांची जुनीच थंडी,
नवीन जाकिट, जुनीच लोकर
भूक आंतली भरून येतां,
वर प्लेटोचा येतो ढेकर ! ५

पूं--स्त्रीत्वाच्या धरणावरती,
सखा सखीला अपुल्या भेटे,
समर्थनाच्या घाटावरती,
पावित्र्याचीं जळतीं प्रेतें ! ६

शुद्ध बिचाऱ्या तत्वापोटीं,
अजुन वासना लपते लोचट,
पीक जरी भरघोस वाढलें,
अजुन मनाचा घाटा पोंचट ! ७

--जगदीश खेबूडकर

निशा हिर्डे :-- भंडारा येथील प्रख्यात वकील अ. रा. हिर्डे यांच्या पत्नी. प्रयागचीं 'साहित्यरत्न' परीक्षा उत्तीर्ण. भंडारा येथील एका विद्यालयांत शिक्षका. 'मुरली-रव' नांवाचा कृष्ण-काव्यसंग्रह १९५७ मध्यें प्रसिद्ध. समितीच्या 'सेविका' मासिकांतून कांहीं कविता व हिंदी लघुकथा प्रसिद्ध.

## : महाराष्ट्र साहित्य संमेलन चिरायु होवो :

मराठ--मंडळ नाव गाजवी शौर्यबळानें जयीं
हानी पावुन डळमळली ती मोगल सत्ता तयीं
राष्ट्रा-राष्ट्रांमधुन गर्जना उठत 'वीरहो चला
राष्ट्रपती हा शूर शिवाजी, शंभू अवतरला
साकारानें हिंदुसत्ता आली वैभवशाली
होत कराया एका, ज्ञानबा, तुका संतमंडळी
त्यजुनी संस्कृत, प्राकृत वाणी प्रचारांत आणली
संस्कारानें दूर सारुनी, उच्चपदीं नेली
मेळा करुनी संतजनांनीं ज्ञानामृत पाजलें
लहान थोरां गीता, ओवी, अभंग पेय दिलें
नक्र पकडता करी धावला कमलापति भूवरी

चिरायू करी हत महाराष्ट्रा वीर, संत मंडळी
रामदास वाढवी तनू-बल एकी राष्ट्राची
युथिका-सद्गुण अमोघ वाणी प्रकटवी संतांची
होता नव्हता स्वार्थ त्यागुनि थोर पुढे आले
वोखटलेला नष्ठ कराया हिरे बहू चमकलें
प्रधान उज्वल ह्या राष्ट्रांतील साहित्याचें अंग
प्रगति-पथावर सदा राहुनी वर्षो नवविध रंग

---निशा हिर्वे

## : 'विविधतंतुनीं हर्ष विणो' :

जगीं विषमता सतत नाचते, तांडवनृत्यें करी थैमान
परी कुणाला हें न उमगते,अटळ अशी कुणि शक्ति महान ।।

उच्चाटन अन् तिचें कराया सारी दुनिया प्राण पणाला
लावुन,आक्रंदन चालविते,विसरून जाओ लुप्त शक्तिला ।।

समाजवादी वाहुन देतिल, काम सारखं दाम सारखे
उन्नत अवनत गति विश्वाची,या तत्वाला होत पारखे ।।

कुठे नादते मंगल वादन, नवशिशु-स्वागत कुठं चालते
दो हृदयाचें मीलन कोठे, स्वर्ग-सौख्य तें मधुर दाविते ।।

त्याच क्षणीं पण अघटित घडतें,मृत्यु-पथाला कुणी लागतो ।
अकस्मात हो घात कुणाचा,स्वर रुदनाचा करुण चालतो ।।

एका उदरीं दोन बंधु पण, एक गांठतो उच्चपदाला ।
एक भटकतो वणवण कोठे, कठीण होई माध्यान्हाला ।।

लतिकेवरती फुलें विलसती,कुणी भुषविती प्रभुचरणाला
तुडविली जाती कुणी पदतलीं,कुणी मृदुलेच्या कचभाराला ।।

धरणीमाता आश्रयदाती,निर्मित तिच्यांत पण विसंगती ।
उंच,सखल,गिरिकंबर कोठे,सागर सरिता जलमय व्याप्ती ।।

सौंदर्याचा अजब नमुना, जन-विक्षण हा खुश करितो ।।
विविधतेंतुनी हर्ष वितो मधु,सुरेल गायन मंजु घुमवितो ।।

– निशा हिर्डे

# : एकदां बोल रे 'आई' :

पाळणा हृदयीं हा केला, राजसास झुलवायाला
होईल रिकामा कैसा ? थांबेल कसा हिंडोला ।।धृ।।
मांडीवर बघतां बघतां, । झोंपला गोडसें हंसतां
तुम्ही अशूभ कांहो वदतां? । तो दुष्ट काळ ने याला ।।१।।
तो याची 'आई' हांक । अजुनियां घुमत कर्णांत
रुतुनियां बसलां हृदयांत । ऐकेन पुन्हां मी बाळा ।।२।।
हा दुडदुड धांवत येतां । मृदु मिठी गळ्याला बसतां
सुख होय भागल्या चित्ता । दीर्घायु मम राजाला ।।३।।
हें माझें मन इवलें फूल । खेळून जाहलें मलुल
कानांत न[illegible]वती डूल । मुखीं हास्यफुलांचा झेला ।।४।।
हीं झुलपें रुळतीं भाळीं । वदनावर झांक लबाडी
अधरांत मौलिकें दडलीं । कां नष्ट कराया आला ? ।।५।।
'राजाचे बाबा याहो । तुम्ही तरी यास लपवाहो'
कोणाला भरविन आतां । रिझवील कोण चित्ताला? ।।६।।
एकदां बोल रे 'आई' । वाजवीं पैजणें पायीं
उघडुन बघ पंकज नेत्र । ना तरी टपति न्यायाला ।।७।।

---निशा हिर्डे

## : कुतुबमिनार : ( एक अनुभव )

दृष्टि कोसळता खालीं
लाट पोटांत फुटली !
आकाशाच्या घुमटाची
अगा अथांग पोकळी !!

चढतांना शिणलेलें
पाय गळून पडले
वर उभ्या कठडचाला
हात घट्ट चिकटले !

खेळांतील घरें छोटीं
अशी विस्कटली दिल्ली
आणि माणसांची दाटीं
रांग मुंग्यांची वाटली !

-- सदाशिव कोंडेकर हंचनाळ

अनंत प्रभाकर गाडगीळ, बी. ए. पुणें. मागच्या पिढीतले मिरजेचे पंडीत प्रभाकरशास्त्री गाडगीळ यांचे ज्येष्ठ चिरंजीव. जन्म गांव मिरज. नियतकालिकांतून काव्य व ललित लिखाण. चाळीसहून अधिक कविता प्रसिद्ध.

## : चिंतन :

तुझ्या जीवनीं पुष्प गुलाबी
सख्या कधीं रे फुलेल कां ?
सुगंध त्याचा येईल कां ?
मम हृदयोचा प्रेम फुलोरा
चरणावरी मी तुझ्या वाहिला
तूंच अंतरीं ठाव घेतला
एक रूपता होईल कां ? १

तव दृष्टीचे होता चिंतन
मानसि माझ्या चाले सितन
हृदयसागरीं होते मंथन
रत्न त्यांतुनी निघेल कां ? २

जीवनांतली ही अंबराई
न कळत फुलली करूनी घाई
विकल मानसी कोकिल गाई
मन मंदिरीं स्वर तो घुमेल कां ३

प्रभा फाकली प्रभात झाली
यौवनांतील फुलें उमललीं
गाते मधुर स्वरांची भूपाली
स्वागत त्यांचें करशिल कां ? ४

अथांग सागर तूं करुणेचा
पूर्णविराम तूं या सरितेचा
आणुनि क्षण तो मांगल्याचा
चिर शांती मज देशिल कां ? ॥५॥

अनंत गाडगीळ
बी. ए

## : नवे क्षितीज :

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
क्रमांक ५६६६२ दि. ३०१३८
२०६९
मराठी ग्रंथ संग्रहालय
१०५४०

इकडे तिकडे नको गडे
जाऊं क्षितीज्या पलीकडे ॥ धृ ॥

तुज सांगाती मजसी सोबत
घेऊनि जाउ चंद्राचा रथ
झडतिल प्रेमाचे रे नौबत
लक्ष लऊनि ऐक गडे ॥ १ ॥

नकोच जन संपर्काचा वारा
नकोच तो संसार पसारा
चल तोडुन भव बंधन दोरा
नकोच इकडे नकोच तिकडे ॥ २ ॥

नकोच बोली बरी अबोली
गवसलीच मज प्रेम शिदोरी
करुचल मनिषा तिथे पुरी
कोडे तुजला काय पडे ॥ ३ ॥

धरणी खाली वर आकाश
त्या पैलतिरी जाण्याची आस
नलगे ठाऊक मग कां अवकाश
नको उगाचि उशिर गडे ॥ ४ ॥

अशीच संधी कधी यायची
रंगसंगती तिथे मजेची
नवी क्षितीजे तिथेच दिसती
उपाधीच नां तिथे जडे ॥ ५ ॥

मजसि नको रे माणिक मोती
नकोच तेजासाठीं ज्योती
ती ज्योती रे तुझीच प्रीति
त्यांच प्रीतिचे पिसे जडे ॥ ६ ॥

अनंत गाडगीळ
बी. ए.

मधुकर विश्वनाथ गोखले :-

सिडन्‌हॅम कॉलेज ( मुंबई ) चे विद्यार्थी, लोकमान्याच्या स्पर्धेत लघुकथेला प्रथम पारितोषिक विद्यालयीन आणि महाविद्यालयीन नियतकालिकांतून कविता, लघुकथा, लघु-निबंध लेखन

# : शब्द तिथें पडतात थिटे :

बाजूस सारून धुक्याचा पडदा
पर्वत जेव्हां येतात बाहेर
काळयाकभिन्न आकाशाचें
वीज जेव्हां फोडते ऊर,
क्षितीज आणि सागराची
भेट होते जेव्हां दूर,
रविराजाला भेटण्यासाठीं
कळी जेव्हां होते आतूर,
सायंकाळीं ढगांमध्यें
येतो जेव्हां रंगांचा पूर,

शद्ब तेव्हां होतात मुळे
शद्व तिथे पडतात थिटे
आवक् होते वाचा तिथे
डोळे तिचे बोलूं लागतात
मन तिथे नाचूं लागतें
वर्तमान जातो विस्मृतिमध्यें
शिल्लक रहाते एकच जाणीव
सौंदर्याची, दिव्यत्वाची !

-- मधुकर विश्वनाथ गोखले

'वसंत' शिरोडा-बागायत :-- कविता ' वसंत ' नांवानेच प्रसिद्ध होतात. मामा-आमदार ना. म. चमणकर-यांनी आजोळला लहानपणीं वसंत नांव ठेवलें होते शालेय जिवनांत वावरत असतांना कविता करण्याचा नाद. गु. कृ. वि. पोटे उर्फ कवि-भानुदास यांचें मार्गदर्शन. सध्या वाचन चालू.

## : दुरस्थ सुहृदास :

( चाल :-- बालिके येशील कधि परतून )

मित्रा, येशील कधि लांबून
जातेवेंळीं भेटलास तूं,
हृदय गेलें भरून ॥ १ ॥

घरिं येउनि रोज रोज मज
जाइ किती भेटून ॥ २ ॥

महिन्यांतूनी दोन पत्रें
प्रेमाचीं म्हणवून ॥ ३ ॥

प्रेमच भरलें त्यामधें फार
क्षेमचार कळवून ॥ ४ ॥

आठवण येते तुझी घडिघडि
मन गेलें करपून ॥ ५ ॥

बहूत दिवस होउनि गेले
येशि रजा काढून ॥ ६ ॥

-- 'वसंत' शिरोडा--बागयत

## : धुंदी. . .! :

काळेशार अंधाराच्या मुलायम संगतींत . . .
. . . एकांताची स्वस्ताई पिऊन,
धुंद आहे रातराणी अन्--
--सुखस्वप्नांची मखमली दुलई ओढून,
जांभळा उखाणा सोडवित आहे . . .
. . . 'षोडशीय' यामिनी !

--अवघें विश्व लपलें आहे-निद्रेच्या जाड चादरींत
नीलांबरांतून उच्छृंखल श्वेतसिंधु कणाकणानें आटत आहे
होत आहे व्यथित बघून-
-भूवरील अथांग दर्याच्या भरतीचा मस्त थयथयाट !

रुसव्या मावळतीला आलिंगण्यास्तव आतुर आहे-
--'पंचवीशीतील' पूर्णचंद्र !

-आणि विकासित होत आहे . . . क्षणाक्षणानें
उगवतीचा गुलाबी गुलाब !

कारण----

होणार आहे अल्पावकाशांत आसुसलें पुनर्मीलन
उषेचें अन् शिशुचें ! !

--यशवंत धर्मोजी गवाणकर
साहित्यविशारद,
माडबन ता. राजापूर

तुळशीराम पुर्णाजी मांगुळकरः-कवि पूर्णानंद. वाङमय व लेखनाची आवड. एस्. एस्. सी. पास. पुर्नविवाह नाटक, बदलतं वारं व उज्वल जीवन ह्या कादंबऱ्या प्रकाशनाच्या मार्गावर. लघुकथा, लघुनिबंध व नभोवाणीकरितांही लिहितात. कविता करण्याचा छंद. सध्यां उमरीममदाबाद येथील शाळेंत शिक्षक.

## : नवजीवन लाभलें ! :

(चाल : फटक्याची)

नील गगनांच्या छता भूषविलें, सुमें तारकांची
गुंजत डोलत, अनिलराज हा, हर्षभरे नाचीं
गातीं खग हे रम्य सुस्वरे, जणूं भाटाची साचे
घाळवली ती मुग्ध शांतता, चिर्बाचिव कोयराते
आरक्तचि हा गुलाल उधळीत, चाले उषाराणी

कुजबुजली तो कांहीं तरी तें पूर्वेच्या कानीं
उभी ठाकली पूर्व लाजरी, करण्याते स्वागत
बिराजला रविराज झडकरी क्षितीज आसनाप्रत
अणूं रेणूतूनी वाहुं लागला, चैतन्याचा झरा
नवजीवन लाभलें, भासली प्रफुल्ल सारी धरा

'पूर्णानंद'

विश्राम मुकुंद बोवलेकर :- शालेय जीवनापासून लेखन. लघुनिबंध, लघुकथा व कविता लिहिण्याची विशेष आवड. बरेचसें लिखाण स्थानिक नियतकलिकांतून झालें. १९५६ च्या 'आवाज' च्या दिवाळी अंकात विडंबनात्मक कवितेला पहिलें बक्षिस. सध्या रा. कृ. पाटकर हायस्कूल वेंगुर्लें येथें शिक्षक.

★

# : आज आली भाऊबीज :

आज आली भाऊबीज
दीप हासले क्षणांत
झळाळलें तेज इथें
खिन्न गहिऱ्या तमांत ॥१॥

कांचनाच्या तबकांत
दीप नाचे नक्षत्रांचा
जसा तुझ्या मुखावर
पदन्यास आनंदाचा ॥२॥

मिळे तव भाव--गंध
कापराच्या सुगंधांत
माझें तप्त मन त्यांत
स्नात, तृप्त पुलकित ॥३॥

रेखिल्या तूं स्वहस्तानें
आज माझ्या सभोवती
नभाच्या प्रदिप्त तारा
शशी शोभे मी त्यामधीं ॥४॥

ओवाळाया सजलिस
असा साज करूनिया
रेखलिस माझ्या भाळीं
कुंकुमाची तुझी माया ॥५॥

नवल आगळें किती !
नक्षत्रांच्या तुझ्या ताटीं
साधी माझी ओवाळणी
तिला नक्षत्रांची कांती ॥६॥

अशी आपुली चालते
कांचनाची भाऊबीज
निष्कांचन जरी मीहि
तरी नाहीं खंत, लाज ॥७॥

आज आली भाऊबीज
दोन माझ्या घरीं दारी
बरसती हृदयांत
दिव्य आनंदाच्या सरी ॥८॥

--विश्राम बोवलेकर
वेंगुर्ला ( जिल्हा-रत्नागिरी )

# : मानवतेपरि धर्म न दुसरा :

मानव्याचा मंत्र शिकाया
मनमिळवावे आधीं हृदया ।।धृ।।

अल्पजीवनी धडपड मोठी
गर्वरूपी विषार पोटी
सदाच कष्टी नाहीं ज्यांना भूतदया
मन मिळवावें आधीं हृदया ।।१।।

श्री उन्मादें दिसे न धरती
दानधर्महि कदा न करती
दृष्टी न त्यांना गरीब दिसाया
मन मिळवावें आधीं हृदया ।।२।।

प्रकाश येतो निशाचि सरता
तशीच येते पुन्हां विभवता
हा भाव पाहिजे मना सुचाया
मन मिळवावें आधीं हृदया ।।३।।

मानवते परि धर्म न दुसरा
तोचि एकला खरा आसरा
मुक्ति मिळाया अन् सुखवाया
मन मिळवावें आधीं हृदया ।।४।।

-- एकनाथ भिकाजी बेंडके, संगमेश्वर

रामचंद्र विष्णु कुलकर्णी :- चाळीस वर्षे प्राथमिक शिक्षकाची नोकरी सातारा जिल्ह्यांत केली. कविता करण्याचा छंद. 'विष्णुसुत' उंब्रजकर या नांवानें अनेक नियतकालिकांतून कविता प्रसिद्ध. फुलोरा, स्वातंत्र्य-शार्दूल, स्वातंत्र्य-केसरी, प्रेमपराग, भावसंगम या काव्य-ग्रंथांतून कविता प्रसिद्ध. ६१ व्या वाढदिवसानिमित्त 'विष्णुसुतांची कविता' हें ६१ पानी पुस्तक त्यांच्या स्नेह्यांनीं १९५६ सालीं प्रसिद्ध केले.

## : मोतीवाला :

( चाल - कां उठतां खालीं बसा )

कां उठतां खालीं बसा तरूण मंडळी
आणिले खरे मोती हे कीं नकोत तुम्हां मुळीं ॥१॥

दावितों पोतडी पहा अतां सोडुनी
लागे न पदरचे कांहीं बघण्यास न शंका मनीं ॥२॥

मुळि नसे मोल या-प्रती जरा कान द्या
अन् बघा खरे मोती हे क्षण गप्पा त्या राहुं द्या ॥३॥

नच प्रसिद्ध मोठा कुणी मी जवाहिरी
म्हणवुनी विनवितों तुम्हां तुच्छता नको अंतरीं ॥४॥
इमिटेशन खोटा नसे मुळें एकही
कीं कल्चर मोती किंवा परदेशी नच यांतही ॥५॥
आवडी तयाचा तुम्हां बहुत मानसीं
एकदां नजर फेंकली सहज ही मनीषा मसी ॥६॥
बोलुनी असे पोतडी तयें सोडिली
काढुनी पुस्तकें मोठी तीं हळुंच पुढें ठेविलीं ॥७॥
पाहुनी 'काव्य बाड' हें 'अरे हा कवी !'
फसविलें तयें आम्हांला कीं जवाहिरी बोलवी ॥८॥
हे नकोत मोती खरे आम्हां लागुनी
लखलाभ असो तुम्हां ते बोलुनी निघाले कुणी ॥९॥
"कां जातां खालीं बसा तरूण मंडळी
नव काव्यें ऐकायाची कां हौस न वाटे मुळीं" ॥१०॥
बोलुनी असे रसिकांस ! बसवुं लागला
परि अखेर बाडापाशीं एकला कवी राहिला ॥११॥

-- विष्णुसुत उंबजकर, कऱ्हाड

# : समाजहितैषी नानकाका :

नानकाका महाशूर, महशूर तसा जनीं
प्रतिज्ञा एकदां घोर करी 'दे. भा.' नुकारणी
'वेचीन तनुही माझी, मन अन् धनसंपदा
प्राणप्रिय अशा माझ्या देशकाजार्थ मी सदा
त्याची दारूण ऐकुनी प्रतिज्ञा मित्र बोललें
'कृपादृष्टीं करी आम्हां, त्वां हें बोलूं नयेस रें'
'आतां न फिरती माझें' वदे तो 'शब्द बोललें'
मंद मी कां असा होऊं ? मरूं निःसत्वतानलें
'अरेरे, कोण हचा माझ्या देशाते मजवाचुनीं-
झटलों जर मी नाहीं, सोडवी आपदांतुनी
तयाचे मित्र ते सारे बोल ते ऐकताक्षणीं'
'शाबास !' वदती त्यासी जणु एकमुखातुनी

२

होता बांधव काकाचा कराया प्रेम एकला
पटकी परि होऊनी मृत्युदारीं पहूडला
'तयाच्या शुश्रुषेसाठीं जावें येथुनि सत्वरी

विनंती परि मित्रांची सपशेल धुडकावली
वदला, 'किति साक्षेपे जीव मत्बंधु-कारणीं'
'लाविला असतां मी हो !' मातें तें भाग्य कोठुनी
'सांगा कीं प्रिय मित्रांनो ! गेलों मी तिकडे असा'
माझिया तर देशाची होईल किती दुर्दशा ?
रक्षावा जीव स्यां यत्नें माझा कीं देशकारणीं
झुंझाया होऊं तो सिद्ध ईर्षा ही बाणतें मनीं
ऐकतां वच हें त्याचें हास्याचा उठला स्वर
यथार्थ दिसतो आम्हां तुझें बोल खरोखर

३

लोटतां दिन थोडेसे काका होई प्रकाशक
अकस्मात वृत्तपत्राचा पुरवावया स्व-कौतुक
शिव्यांचा नित्य वर्षाव करी तें वृत्तपत्रक
कधीं गद्य, कधीं पद्य योजुनी द्वेषमुलक
मावळी कीर्ति लोकांत होई कार्यभरे कृश
उलाढाली स्वराज्याच्या म्हणजे तीक्ष्ण अंकुश
घालुनी अपुला काळ जितका वृत्तलेखनीं

पलंगीं सुखशय्येत जाई दुप्पट त्याहुनी
बहापट तसा लागे नाना मिष्ठान्न सेवनीं
फडशा होतसे रोज ताटें मागुनी मागुनी
'वहावा' करिती मित्र 'भलें शाबास नानजी'
जाई उच्चांक भेदूनी योजी नवतृप्ति जी

४

एकदां नानकानें वृत्तपत्रांत रोखिलें
परपक्षावरी एका तीव्र टीकास्त्र आपुलें
येऊनी धरिली जेव्हां त्ये मानगुटी खले
आरडू ओरडू लागे काका तै फार व्याकुळ
'गेलो, मेलो मला सोडी' दयेची करि याचना
'बापरे मारणें ऐसे सभ्यतेला कमीपणा'
'कल्पना ये तुला कैशी मेलो जर मी असा'
होईल मग मद्देश सर्वथा असहायसा
'शिक्षा वाटेल ती दे तूं, मी तुला अपमानिलें
'धुळींत खुपसूं नाक ? तुला हें जर मानलें
'करितो मी पहा तेंहो ! मित्र तै वदती भले
किती हे छान केलेस ! साच धोरण आगळें



REFBK-0010570
REFBK-0010570

-: म न्थ न :-

दा. क्र. १०५५०. ५

काका तेंपासुनी लागे सदा राहूं गृहांतरी'
की बाहेर कुठे जाता अपघातां पडू बळीं
वहानांमधुनी टाळी जायाचा कसल्याहि तो
उलथुनी पडायाचे, कोण वा भय साहातो ?
नाना जल समाधी तें किती घेती निरंतर
नांव ना आगगाड्याचे तयांची नित्य टक्कर
तसें पायीं नको जाणें, भय त्यांत असे किती!
श्वान सर्पादिक प्राणी प्रत्यही उंखु पाहती !
दुचाकी चारचाकीच्या गाड्या भर्धाव धावती
भीतीची पादचारींना स्थळे हीं मार्गि चोरटी
सोडीना गेह तो, कंठी कष्टी जीवन यास्तव
'जयोऽस्तु' वदलें मित्र, 'नानजी कुशली भव!

जन्मती 'दे. भ.' देशी जे महनीय असे भलें
गोरबाया तयांसी हे अर्पिता काव्य सोनुलें !

-- नरेन्

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ५६६८२ वि: काव्य
क्रमांक 2069 नों. दि: 30/3/69